मधुकर सोनवणे

# केन उपनिषद



# केनोपनिषद

## काव्यमय भाष्य

# मधुकर वि. सोनवणे

# केनोपनिषद

मधुकर वि. सोनवणे

20, विजय नगर कॉलनी
नवा आडगाव नाका पंचवटी नाशिक-3
422003
फ़ोन: ९४२२२७५६३३३

**msonavane@hotmail.com**

हे पुस्तक प्रताधिकारमुक्त असून
आपण हे कायदेशीररित्या
कोणालाही विनामूल्य पाठवू
शकता.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com


esahity@gmail.com

प्रकाशन : ३० ऑगस्ट २०२१ श्रावणी चतुर्थ सोमवार १९४३

**(श्रीकृष्ण व गुरुदेव श्री ज्ञानदेव जयंती)**

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



# अल्प परिचय

मी मधुकर वि.सोनवणे.

रेल्वेत ३६ वर्षे नोकरी करून १९९७ मध्ये नोव्हेंबरमध्ये कोंकण रेल्वेतून डेप्युटी चीफ इंजिनिअर म्हणून सेवानिवृत्त.

लहानपणी वयाचे आठव्या वर्षी ज्ञानेश्वरी जीवनात आली. करपात्री स्वामी, बाळकोबा भावे आदिंनी गीता व ज्ञानेश्वरी यांच्यात खोल जाण्याचा उपदेश केला. सुदैवाने अनेक महनीय व्यक्ती जीवनात आल्या आणि आता प्रभु लेखनाला आपणा पर्यंत पोचाविणारे निष्काम 'ई साहित्य प्रतिष्ठान' यांचे पाठबळ लाभले. ही सर्व अनुकुलता लाभण्याची कृपा माऊलीची आहे त्यांना विनम्र वंदन.

ज्ञानेश्वरीचा अभ्यास करीत असतांना १६ व्या अध्यायात श्रुतींचा अभ्यास होणे हे भगवंताच्या गोचर होण्यासाठी आवश्यक सांगितल्याची ओवी वाचल्यावर उपनिषदांच्या अभ्यासाकडे ओढले गेलो. आज श्री ज्ञानदेव व भगवान कृष्णाची पावन जयंती आहे. त्यांना विनम्र नमस्कार.

उपनिषदांचे तत्वज्ञान हे ज्ञान-मार्गावर आधारित आहे. हे तत्वज्ञान जीवनाला कल्याणाचा मार्ग दाखविते. विविध उपनिषदांचेवर भाष्ये वाचून त्यांचा आशय काव्यात उतरविण्याचा कार्यक्रम सुरु आहे.

‘ई साहित्य प्रतिष्ठान’ या प्रख्यात संस्थेने यांत रुचि दाखविल्याने जमेल तेवढ्या उपनिषदांच्या काव्यमय आशयाचे कार्य सुरु केले आहे. हेच श्रावणी सोमवारचे फलित आहे.

या उपनिषदात हे अंतर्बाह्य जीवन कसे साकारले जाते हे छान सांगितले आहे.

यातील उपयुक्त लेखन ही स्वामींची कृपा व माऊलीचे पाठबळ यामुळे झालेले आहे. यातील उणीवा हा माझ्या अल्प ज्ञानाने झालेल्या आहेत. त्यावाद्दल क्षमायाचना

आपणा सर्वांना या उपनिषदाने जीवनात ज्ञानाचा लाभ होवो व जीवन उज्वल होवो. हीच भगवंताला प्रार्थना

**अण्णा**

{मधुकर वि. सोनवणे}

३०/०८/२०२१. श्रावणी चतुर्थ सोमवार (श्रीकृष्ण व गुरुदेव श्री ज्ञानदेव जयंती)

# अर्पण पत्रिका

**हे लेखन माझे जीवन घडविणारे गुरुदेव ज्ञानेश्वर माऊली व भगवान श्रीकृष्ण यांना सादर समर्पित.**





**आज श्रावण वद्य अष्टमी. श्रीकृष्ण जयंती आणि ज्ञानदेवांचीही जयंती. श्री गीता हे श्रीकृष्ण यांची व ज्ञानेश्वरी ही ज्ञानदेवांची वाङ्मयीन मूर्ती. सुदैवाने आज श्रावणातील सोमवार आणि हा जयंती पावन दिवस एकाच दिवशी आलेत.**

**माझ्या स्वप्नात माऊली येऊन गेल्याने व नित्य माझ्या हृदयी असल्याने, माझे जीवन पावन झाले. माझ्या सर्व अध्यात्मिक लेखनाचा बोलविता धनी तेच आहेत.**

**हृदयी बसलेल्या गुरुदेवांच्या सहवासाने मी तृप्त आहे. आहे ते जीवन माउलीच्या हाती सोपवून मी निर्धास्त झालो आहे.**

**पुनश्च पूर्ण जीवन व हे लेखन समर्पित.**

**अण्णा {श्रावण वद्य अष्टमी} .३०/०८/२०२१**

# केनोपनिषद – काव्यमय भाष्य

आधार-

१. स्वामी परमार्थानंद यांचे भाष्य

२. स्वामी विद्यानंद भाष्य [२००७]

३. कल्याण उपनिषद अंक

४. श्री शरद यांची उपनिषदे ही मिपा. तील लेखमाला

# केनोपनिषद - मनोगत

केनोपनिषद हे सामवेदातील 'तलवकार ब्राह्मण' याचे अंतर्गत व अति प्राचीन असे आहे.

या उपनिषदात आलेल्या शंका या साधकाच्या मनात सहजी येणाऱ्या अशा आहेत.

पहिल्या दोन खंडात आत्मबोधाची उकल करून पुढच्या दोन खंडात एका सूचक गोष्टीने अधिक खुलासा होतो.

पूर्ण उपनिषद वाचतांना आपल्या अनेक शंका सहजी दूर होत जातात.

हे काव्यमय भाष्य आपणास परमसत्यप्रत नेवो हि अपेक्षा

हरि ॐ ||

अण्णा

(मधुकर वि.सोनवणे)

नाशिक-पंचवटी

३०/०८/२०२१..

श्रावण वद्य अष्टमी { भगवान श्रीकृष्ण आणि गुरुदेव ज्ञानेश्वर यांच्या जयंतीचा पावन दिवस}

# केनोपनिषद काव्यमय भाष्य

## शांतीमंत्र

*ॐ आप्यायन्तु ममाङ्गानि वाक्प्राणश्चक्षुः श्रोत्रमथो बलमिन्द्रियाणि च सर्वाणि।*

*सर्वं ब्रह्मौपनिषदं, माऽहं ब्रह्म निराकुर्यां मा मा ब्रह्म निराकारोदनिराकरणमस्त्वनिराकरणं मेऽस्तु।*

*तदात्मनि निरते य उपनिषत्सु धर्मास्ते मयि सन्तु ते मयि सन्तु॥*

*ॐ शांतिः, शांतिः, शांतीः ||*

**हे भगवंता, वाणी, प्राण नि, नेत्र कर्ण मम, पुष्ठ असो |**

**सकल इंद्रिये, देह पूर्णचि, न्यून कशातहि कांही नसो || १**

**सक्षम देहे, श्रवण-मननहि, नित्यचि उत्तम ते होई |**

**सुयोग्य तेणे निदिध्यासन नि, आकलना ना बाधाही || २.**

**श्रुति करवी मज ब्रह्म समजता, स्वीकार व्हावा पूर्णपणे |**

**ब्रह्मानेही स्वीकार माझा, नित्य असाची तो करणे || ३.**

कैसे तुजला, मी जाणावे?, नसेच कधी ती अनुभूती |
यथार्थ व्हावी जाण मला ती, हेच विनवी मी अल्पमती || ४

यथामती मी तुला जाणता, जैसा मजला वाटतसे |
सत्य मला ते विदित करावे, सुयोग्य मार्ग जये गवसे || ५.

श्रुति दावितील, त्या सन्मार्गे, जाणे सहजी मम व्हावे |
विवेक-दीपहि नित्य प्रज्वलित, आदर्शा ना सोडावे || ६.

म्हणती श्रुति त्या, सकल ब्रह्म हे, द्वैत सोडीना परि मजला |
ज्ञान दृष्टी करी प्रदान ऐसी, अनुभूति योग्यचि होत मला || ७.

व्यवहारी या जगात असता, पूर्ण विरक्ती ती यावी |
हृदयमंदिरी, राहुनि माझ्या, नित्य प्रेरणा ती द्यावी || ८.

मोह, द्वेष आसक्ती, असुया, काम-क्रोध हे सकल टळो |
नित्यचि निर्मळ, अंतःकरणे, पवित्र तंव सहवास मिळो || ९.

जीवनपथी ने सांभाळुनिया, प्राप्त कशीही असो स्थिती |
त्रिविध तापहि दूरची राहो, मनी असावी नित शांती || १०.

|| ॐ शांतिः, शांतिः, शांतीः ||

# केनोपनिषद प्रारंभ

## प्रथमः खण्डः

*ॐ केनेषितं पतति प्रेषितं मनः, केन प्राणः प्रथमः प्रैति युक्तः।*

*केनेषितां वाचं इमां वदन्ति चक्षुः, श्रोत्रं क उ देवो युनक्ति ॥१॥*

विनम्र भावे शिष्य पुसतसे, पृच्छा आपुली ती गुरूला |

जीवन माझे कैसे चाले?, सुबोध याचा ना झाला || १.

विशाल विश्व नि विषयहि अगणित, सागर भवती दृश्यांचा |

जेही अनुभवे मन त्या त्या क्षणी, तैसा प्रवाह जीवनाचा || २.

नित्य बदलत्या, विश्वामाजी, सुचवितसेचि ते कोण मना ?|

कोणत्या क्षणी बाह्य जगती या, कसे वर्तणे या सुचना ?|| ३.

धावे मन ते सदैव चंचल, क्षणभरहि ते स्तब्ध नसे |

ज्ञान इंद्रियाद्वारे मानसी, बुद्धी कृतीला करवितसे || ४.

कोण नियामक वसे अंतरी, दावितसे तो पथ आपणा? |

जेणे धावे मन तिकडेचि, बदली जीवन प्रति-क्षणा || ५.

अफाट जगतामाजी अचानक, अकल्पित कुणी सहजेची मिळे |

बदले खेळचि, जीवन पथीचा, कोण करविते हे सगळे ?|| ६.

कोणत्या क्षणी कैसे करणे?, देत प्रेरणा, कोण तया ?|

मनाचेही मन, देव कोणता? सांगे मजला गुरुराया || ७.

वाणी येते ओठावरती, काय नि कैसे बोलावे?

भाव-भावना शब्दामधुनी, कुणामुळे जुळुनी यावे ?|| ८.

देह चालतो जगतामाजी, जोवरी प्राणचि संचारी |

कोण नियामक असे तयाचा?, क्षणात घालवी बाहेरी || ९.

आनंद शोक नि सुख-दुख योगे, जीवन रथ चालत राही |

आणि अचानक जात प्राण तो, आताच होता, तो नाही || १०.

प्राणाचा त्या कोण प्राणचि, देव कोणचा त्या नियमी?|

केंव्हा जावे सोडुनि देहा, ऐसा कोण करवी स्वामी ?|| ११.

कान ऐकती, नेत्र पाहती, ज्ञान त्यांतुनि जे निपजे |

कोण जोडिते, त्या ज्ञानाला? विषय जये मना उमजे ?||१२.

*श्रोत्रस्य श्रोत्रं मनसो मनो यत्, वाचो ह वाचं स उ प्राणस्य प्राणः।*

*चक्षुषश्चक्षुरतिमुच्य धीराः,प्रेत्यास्माल्लोकात् अमृता भवन्ति॥२॥*

**उत्तरती आचार्य त्यावरी, देह, मन नि जग जडचि असे |**

**ते सारेचि नश्वर-क्षणिक नि, इंद्रिय-गम्य कि, भासतसे || १३.**

**साधनेची ती, आकलनास्तव, तेजे उसन्या प्रकाशती |**

**शक्तीची भांडारचि जाणीव, अस्तित्वे भारवी शक्ती || १४.**

**निराकार नि निर्गुण निश्चल, जाणीव व्यापी सकलाशी |**

**सहजी संपर्केचि प्रेरक, जड मिळते चैतन्याशी || १५.**

**द्रव्य नि उर्जा, गुणा बदलती, जाणीव स्पर्शे होताची |**

**शक्ती प्रगटे देवरुपेची, किमया सारी ब्रह्माची || १६.**

**जाणीव चक्षूचीहि चक्षु ती, असे श्रवणहि श्रवणाची |**

**जाणीव प्रगटे, हृदय मंदिरी, सुप्त शक्ती ती ब्रह्माची || १७.**

**जाणीव ही जी अस्तित्वाची, तीच 'मी' असे शाश्वत जी |**

**प्रारब्धे ज्या देहा आश्रय, प्रगटे सहजी तयामाजी || १८.**

नियमन करी ती गुप्तचि जाणीवे, अस्तित्वाने जी स्फुरते |
जया जसे प्रारब्ध रेखिले, वृत्ती सहजी ती होते || १९.

इंद्रीयाशी जे काम नेमिले, त्या कार्यास्तव जी शक्ती |
ती ती त्याची, रूपे प्रवेशे, तशीच प्रेरणा होई ती || २०.

सर्वव्यापी जी जाणीव आत्मा, देही असे, परि देह नसे |
तिच्या मुळेचि देह चळतसे, ती केवळ साक्षीच असे || २१.

देहाचे हे वस्त्र बदलता, मुक्तचि ती ना परिणामे |
देहाच्याही अतीत नित्य ती, जाणतसे सारी कर्मे || २२.

जाणीव जाणवते ती केवळ, जेंव्हा होई अनुभूती |
दैवी तत्व ते परब्रह्माचे, अनुभव येता ती शांती || २३.

देह मनाच्या योगे करवी, वाटचाल आयुष्याची |
विवेक वैराग्ये व्यवहारी, कार्ये करणे जगताची || २४.

मी ना देह नि नसेचि मन हि, हे न कदापि विसरावे |
मुक्ति नित्यची ती साधावी, ब्रह्मी ऐक्य न सोडावे || २५.

नित्य कर्मयोगाचे आचरण, स्वधर्म पालन धैर्याने |
तृतीयाध्यायी गीतेत कथिले, यथार्थ तैसे आचरणे || २६.

गीतेत आठव्या नवव्यातही जी, उपासना ती भगवंते |
आचरुनी तिजला श्रद्धेने, मिळवावे ते ब्रह्माते || २७.

तेरावे गीता अध्यायी, कथिले निराकार ध्याने |
आकाश आणि प्रकाश उभया, अद्वैतीची अनुभवणे || २८.

तेणे शाश्वत निराकारचि, जाणीव अनुभूत ती होई |
अनंत नित्यचि निर्गुण निश्चल, जाणीव ध्यानी ती येई || २९.

अहंकार नि स्वामी-भावही, मन-देहासह त्यागावे |
ममत्व संग्रही नि परिवारी पुर्णत्वेचि सोडावे || ३०.

स्वामित्वाच्या दृढचि भावना, खोलचि ज्या रुजल्यात मनी |
तया सोडण्या धैर्य विरक्ती, साधे तो धन्यचि जनी || ३१.

साधे अंतरीच्या संन्यासे, गहन चिंतने अनुभव तो |
स्वामी-भाव ना उपयोगीपण, व्यवहाराला घडवितो || ३२.

आपण केवळ ते सहभागी, हाती नियंत्रण ना कसले |
म्हणुनी स्वामी-भाव, नियंत्रण, उभय सहजी ते नच आपुले || ३३.

भोक्ता आणि सहयोगीचि, वृथा भाव ते सोडावे |
सहजी आले जे वाट्याला, निष्कामे करीतचि जावे || ३४.

ऐशा अंतरीच्या संन्यासा, श्रुति नेहमी अपेक्षिती |
वर्तमान तो नित्य जाणणे, भविष्याची नसे खंती || ३५.

गीता चौदावे अध्यायी, चोवीस श्लोकी हे कथिले |
नित्यचि समदृष्टी ती असता, सारे प्रियचि ते झाले || ३६.

कठीण समस्या, मार्ग दिसेना, म्हणे “मरण ते देई हरी “|
प्रयास वाढविण्याशी जीवन, दर्शवी अहंकार उरी || ३७.

जणु देहावरी स्वामित्व माझे, केंव्हा त्याने ते जावे |
त्यासाठीचि धडपड करणे, अहंकारचि समजावे || ३८.

देह न माझा, साधन मजशी, मृत्यू प्रारब्धे येई |
नको अपेक्षा, जीवनकाला, कदापि हे, माझे नाही || ३९.

जन्म-मरण ते जये नियोजित, त्याशी नियंत्रित कुणी न करी |
सहजी स्वीकारी, जे ही घडते, पूर्ण विरक्ती हवी उरी || ४०.

मरणकाळ तो येता देहा, पूर्ण विरक्ती साधावी |
देह नसे हा माझा, समजुनी, मनी शांतता पूर्ण हवी || ४१.

अलग बर्फरुप, जैसे वितळे, हिमनग सिंधुत तो सहजी |
तैसे सहजी जीवे विरावे, ज्ञाने परमात्म्यामाजी || ४२.

अशा आंतरिक संन्यासे ती, लाभे मानसिक शांती |

श्रेष्ठ साधना जेणे साधे, सहजी ती जीवनमुक्ती || ४३.

ऐसे सद्गुरू सांगे शिष्या, दैवी तत्व हे चालविते |

असे शुद्धची जाणीव ती तर, जेणे सकला व्यापियले || ४४.

प्राणांचीही असे प्राण ती, देहा केंव्हा सोडावे ?|

हे नच प्राणाचेही हाती, जाणीवचि ती हे ठरवे || ४५.

दैवी तत्त्व हे जाणुनि घ्यावे, तेचि नियंता सकलांचा |

अहंकार नि मम-भावहि तो, सहजी जाई तो त्याचा || ४६.

तेणे समाधान, निर्भयता, आणि शांती लाभतसे |

अस्तित्वहि ते जीवन-मुक्तचि, चिरंजीव तो होत असे || ४७.

*न तत्र चक्षुर्गच्छति न वाक् गच्छति नो मनः ।*

*न विद्मो न विजानीमो यथ एतत् अनुशिष्यात् ।*

*अन्यदेव तत् विदितात् अथो अविदितादधि ।*

*इति शुश्रुम पूर्वेषां ये नस्तद्व्याचचक्षिरे ॥ ३ ॥*

**सर्वव्यापी जरि परब्रह्म ते, नेत्र न पाहू त्या शकती |**

**शक्य न वर्णन त्या वाणीने, मनाचीही खुंटते गती || ४८.**

**विषय नसे तो जाणुनि घेण्या, नसे प्रमाणहि त्या कांही |**

**ज्यांनी अनुभवलेहि त्याला, सांगू शकती ते नाही || ४९..**

**जया जाणणे, तोचि ज्ञाता, घडे जाणणे मग कैसे ?|**

**अनुभूती हि निजरुपाची, म्हणुनि शब्दी येत नसे || ५०.**

**मी न देह-मन, न वा इंद्रिये, ठामचि ठेऊनी ऐशी मती |**

**मी ती जाणीव, ऐसे स्मरूनी, घ्यावी तियेची अनुभूती || ५१.**

**जाणणेचि हे जाणायाचे, म्हणुनि ज्ञात ना अज्ञात |**

**अनंत व्यापक निराकारहि, असुनि न दिसणे हे ख्यात || ५२..**

तिज अस्तित्वे ज्ञान इंद्रिया, होई त्या त्या विषयांचे |

परि न विषय ती, आणि इंद्रिये, ज्ञान न होई ते तीचे || ५३.

ती जाणीव ना अन्य कुणीही, मीचि तिजला धारीतसे |

देहे व्यापिता, फुका अहंता, वाटे देहा मीचि असे || ५४.

ज्ञान-शक्ती ती ज्ञान-इंद्रिया, माझ्या संपर्केचि मिळे |

दृश्य उमगते जाणीव योगे, गती विश्वाला तिच्यामुळे || ५५.

सर्वव्यापी ती जाणीव मीचि, अवयव नाचि देहाचा |

पूर्णचि स्वाधीन, देह-प्राण मन, चारही आणि त्या वाचा || ५६.

या सकलांची ज्ञान-शक्ती मी, पूर्ण शक्तीचे भांडार |

चलन वलन तैसे आकलन, पूर्णचि माझा आधार || ५७.

असीम जाणीव सर्वव्यापी ती, शाश्वत अस्तित्वचि माझे |

देह जाई परि, जाणीव नित्यचि, ऐसे ज्ञाता मज उमजे || ५८.

देह सोडिता, अलगचि जाणीव, स्पर्शे ना ती कार्याला |

थबकती म्हणुनि जग व्यवहारहि, मी न सहाय्या कि त्याला ||५९.

अस्तित्वाची आपुल्या जाणीव, देही सहजी, होत असे |

आत्म-अनुभूती स्वये अनुभवी, स्वयेचि हे जाणणे तसे || ६०.

माझे असणे, सहजी उमगे, अस्तित्वाची जाणीव ती |

स्व-संवेद्य ते म्हणुनि म्हणती, माझीच मजला अनुभूती || ६१.

आम्ही ऐकियले ते ऐसे, ज्ञात नि अज्ञाता पुढती |

आत्मवस्तू ती असे विलक्षण, खुंटे सांगायास मति || ६२.

*यद्वाचाऽनभ्युदितं येन वाक् अभ्युद्यते ।*

*तदेव ब्रह्म त्वं विद्धि न इदं यत् इदं उपासते ॥ ४ ॥*

**वाणी न समर्थ त्याशी वर्णने, शब्दचि परतुनिया जाती |**

**वाणीस शक्ती वर्णायाची, त्याजमुळेचि लाभे ती || ६३.**

**देही दैवी तत्व असे जे, देत ज्ञान-ग्रहणशक्ती |**

**जे न दिसे परि त्या अस्तित्वे, इंद्रियास लाभे शक्ती || ६४.**

**त्या तत्वे जाणीव होतसे, तोची आत्मा, वा ब्रह्म असे |**

**ज्याची जाणीव, इंद्रियास ना, कारण त्याशी न गवसे || ६५**

**श्रद्धा, विश्वासे ते उमगे, प्रमाण त्याज नसे कांही |**

**जाणीवेची ती जाणीव कैची? व्यक्ताया मार्गचि नाही || ६६.**

**त्या अस्तित्वे अस्तित्व आपणा, जाणीव हि अस्तित्वाची |**

**अदृश्या ते असे जाणणे, ओळख अन्य न मार्गेची || ६७.**

**ब्रह्म असे ते निराकारचि, विशिष्ट आकारे न भजे |**

**'अमुक' अशी ना ओळख त्याची, ऐसेचि त्याशी उमजे || ६८.**

त्याची मूर्ती अथवा प्रतिमा, सगुणचि प्रारंभी पुजणे |
अद्वैताविण नसे अनुभूती, पूजन भजनी ती नेणे || ६९.

निराकार साकारे पुजिता, केवळ अज्ञानी तृप्ती |
भलत्या वाटे कितीही जाता, कैशी ध्येयाची प्राप्ती ?|| ७०.

कर्मकांड ते शुद्धी करवी, शुद्धाचरणा वाढविती |
ब्रह्मप्राप्ती परि नच ती तेणे, नित्यचि ती तर अद्वैती || ७१.

ज्ञानकांडचि ब्रह्म अनुभवी, नच कर्मे नि उपासना |
होत प्रार्थना सहाय्यकारी, प्रपंच प्रश्ना सोडविण्या || ७२.

येथे नाही कांही लाभणे, केवळ विसरची घालविणे |
आपुलेचि निज-रूप जाणणे, जे साधे केवळ ज्ञाने || ७३.

ब्रह्म न लाभे ध्यान पूजने, लाभे निजरुपी अनुभविता |
चैतन्यात्मक आत्मा अवगत, पंचकोश उल्लंघुनि जाता || ७४.

ते आपलेपण नित्य जपावे, जाणीवेस त्या अनुभवुनी |
स्थल कालाच्या अतीत जावे, देह भाव तो विसरोनी || ७५.

शुद्धचि ऐशी जाण ठाम ती, अनंत जाणीव मी चि असे |
तीचि ब्रह्म ते, सत्य एकले, अन्य त्याविणा कांही नसे || ७६.

**जीव-जगत-नि ईश्वर नामे, केवळ व्यवहारासाठी |**

**अलग नाम नि कल्पित रूपे, ही सारी खेळासाठी || ७७.**

**त्याला मानुनी ब्रह्म असे ते, पूजन व्यर्थचि ना करणे |**

**जाणीवेशी ते नित्य जाणणे, ज्ञानी भक्तचि ते होणे || ७८.**

*यन्मनसा न मनुते येन आहुः मनो मतम् ।*

*तदेव ब्रह्म त्वं विद्धि न इदं यत् इदं उपासते ॥५॥*

**मन जे चिंतन करू शके ते, ब्रह्म कदा त्या म्हणू नये |**

**तेचि असे परि समर्थ ब्रह्मचि, लाभे चिंतन शक्ती जये || ७९.**

**दीप प्रकाशे दिसते सारे, दीप न, दीपा तये दिसे |**

**ऐसे चि ते ब्रह्म जाणणे, मनोचिंतने ना गवसे || ८०.**

**त्या ब्रह्माची करि उपासना, ना जे चिंती मनाद्वारे |**

**विषय नसे ते मुळी मनाचा, म्हणुनि मन ना समर्थ रे || ८१.**

*यच्चक्षुषा न पश्यति येन चक्षूंषि पश्यति ।*

*तदेव ब्रह्म त्वं विद्धि न इदं यत् इदं उपासते ॥ ६ ॥*

**नेत्र न पाहू शकती ब्रह्माशी, घडे पाहणे त्याचिमुळे |**

**देई ते शक्ती बघण्याची, सक्षम जेणे कि, डोळे || ८२.**

**म्हणुनी बघविणारी जी शक्ती, ब्रह्म त्यासिची जाणावे |**

**नच ते जे डोळ्यास वाटते, ब्रह्म म्हणुनि न उपासावे || ८३.**

*यच्छ्रोत्रेण न श्रृणोति येन श्रोत्रमिदं श्रुतम् ।*

*तदेव ब्रह्म त्वं विद्धि न इदं यत् इदं उपासते ॥ ७ ॥*

**जयाचिया प्रेरक शक्तीने, श्रवणा श्रवणाची शक्ती |**

**परि श्रवणे ज्या ब्रह्म समजशी, नाही मुळी रे जाणीव ती || ८४.**

**विषय नसे हा श्रवणांचाही, ऐकुनी उपासतोशी जया |**

**नसे ब्रह्म ते, उपासनेस्तव, वृथाचि श्रम ते कां वाया ?|| ८५.**

**ऐकुनि प्रतिमा जीही मानसी, कल्पनाचि ती ब्रह्म नसे |**

**कारण ज्यांनी त्या अनुभविले, ते न कदापि वर्णीतसे || ८६.**

*यत्प्राणेन न प्राणिति येन प्राणः प्रणीयते ।*

*तदेव ब्रह्म त्वं विद्धि न इदं यत् इदं उपासते ॥ ८ ॥*

**प्राण शक्ती जी श्वासाद्वारे, लाभे ज्याचिया योगाने |**

**तेचि ब्रह्म जे देत प्रेरणा, जीवन चाले श्वासाने || ८७.**

**प्राणाचाही असे प्राण ते, ब्रह्म तेचि ना अन्य असे |**

**नसे उपाधी त्या ब्रह्माशी, अन्य कांही ते ब्रह्म नसे || ८८.**

**करि उपासना त्या ब्रह्माची, उपाधी नाम नि रूप नसे |**

**ब्रह्म समजुनी, उपासना ना, जे अनात्म्यची असे || ८९.**

**सर्वव्यापी तो समर्थ आत्मा, देत जडा प्रेरक शक्ती |**

**ब्रह्मशक्ती ती चालवी जीवन, सुयोग्य सकला या जगती || ९०.**

**मी न देह मन आणि इंद्रिये, मी चि चिरंजीव ब्रह्म असे |**

**देह मन हि ते साधन केवळ, कल्पनेविणा अन्य नसे || ९१.**

**प्रथम खंड समाप्त**

# द्वितीय खंड प्रारंभ

*यदि मन्यसे सुवेदेति दभ्रमेवापि नूनं त्वं वेत्थ ब्रह्मणो रूपम् ।*

*यदस्य त्वं यदस्य  देवेश्वथ नु मीमांस्यमेव ते मन्ये विदितम्॥१॥*

**आचार्य म्हणती शिष्याला कि, स्वरूप ब्रह्माचे जैसे ?|**

**उत्तम ऐसे मला समजले, ऐसे तुजला वाटतसे || ९२.**

**ध्वनित ऐसे निश्चित होई, अल्प उमगले असे तुला |**

**पुन्हा नीट घे करूनि ज्ञान ते, यथार्थ जाणुनि घे त्याला || ९३.**

**अति श्रेष्ठ हे ज्ञान असे जे, पूर्ण यथार्थचि जाणावे |**

**अंश-ज्ञान ते ना उपयोगी, पूर्ण ज्ञानचि ते व्हावे || ९४.**

**‘ज्ञान जाहले मज ब्रह्माचे’, ऐसे म्हणणे अज्ञान |**

**जाणायाचा विषय नसे तो, अद्वैतात नसे दोन || ९५.**

*नाहं मन्ये सुवेद् इति नो न वेदेति वेद च । यो नस्तत् वेद तत् वेद नो न वेदेति वेद च ॥२॥*

**शिष्य म्हणे तो विनम्र होऊनि, यथार्थ मज ते ज्ञान नसे |**

**जे हि उमगले, ऐसे वाटे, ते तर अल्पचि ज्ञान असे || ९६.**

**आधी नव्हते ज्ञान तयाचे, उकलु लागले गुह्यचि ते |**

**प्रवचन आपुले नीट ऐकता, आता मजला जाणवते || ९७.**

**आधी विपरित वा कि, योग्यहि, जाण ती ब्रह्माची आली |**

**तया जाणले ऐसे नाही, देऊळ बाहेरुनि पाही || ९८.**

**अजुनी गाभाऱ्यात न शिरलो, विशाल प्रांगणी उभा असे |**

**मनी परि विश्वास दाटला, होईल ज्ञानहि उत्तमसे || ९९.**

**ब्रह्मज्ञानी असतील त्यांना, कळेल म्हणणे हे माझे |**

**पूर्णचि माझे अवधानचि कि, जेणे निश्चित हे उमजे || १००.**

*यस्यामतं तस्य मतं मतं यस्य न वेद सः ।*

*अविज्ञातं विजानतां विज्ञातं अविजानताम् ॥३॥*

**ब्रह्म समजले नाही म्हणे जो, निश्चित समजे ते त्याला |**

**ज्याशी वाटले, जाणियले मी, बोध तयाला नच झाला || १०१**

**समजणे नि ते नाही समजणे, याही पैल ते ब्रह्म असे |**

**मलाच आहे मीच जाणणे, ब्रह्म मजविना अन्य नसे || १०२.**

**विलक्षणचि हे ज्ञान असे जे, जाणे तो तर ना बोले |**

**आणि जाणता म्हणुनि सांगे, ज्ञान तयाला ना झाले || १०३.**

**कुणी म्हणे मी ध्यानी असता, ब्रह्म पाहिले तेजस्वी |**

**सत्य नसे हे असे जाणणे, समजूत तैशी ती फसवी || १०४.**

**ध्यानी असता, जो जो अनुभव, तो तोचि टाकुनि द्यावा |**

**कांही नुरता, जेही जाणवे, ब्रह्म-भाव तो जाणावा || १०५.**

**केवळ अस्तित्वाची जाणीव, सोडुनिया वेगळेपणा |**

**असे निजत्वाशी समरसणे, करवितसे ब्रह्मज्ञाना || १०६.**

*प्रतिबोध विदितं मतं अमृतत्वं हि विन्दते ।*

*आत्मना विन्दते वीर्यं विद्यया विन्दतेऽमृतम् ॥ ४ ॥*

**आपुल्या अस्तित्वाची जाणीव, नित्य असे जी सुस्थिरचि |**

**जिचिया योगे, ज्ञात होतसे, अनुभुति आणि ज्ञानाची || १०७.**

**बोध होतसे अनुभवातून, याला कारण जाणीव ते |**

**ज्ञाता पाही ब्रह्मालाची, व्यापक जाण तया येते || १०८.**

**दृश्य जरी ते तेचि असले, नाम-रूपे असता कांही |**

**चैतन्यचि ते उपाधीमाजी, गुप्त तयाला तो पाही || १०९.**

**आत्मा म्हणजे शुद्धची जाणीव, प्रकाशवी ती दृश्याला |**

**निराकार दाखवी साकारा, ज्ञाता अनुभवी ब्रह्माला || ११०.**

**उपाधी मधले चैतन्यची जे, गुप्त रूपे खेळवी सकला |**

**ब्रह्मविद्या जो हि जाणतो, सहजी प्राप्ती आत्मबला || १११.**

**ज्ञान दृष्टीने पाही पृथ्वी-जल, आणि नंतर अग्नीला |**

**पुढती वायू, गुप्त सदा तो, परि जाणवे देहाला || ११२.**

**प्रगत ध्यान करी आकाशावरी, निराकार नि निर्गुण ते |**

**व्यापक ऐसे ध्यानहि होता, ब्रह्म-जाण क्षमता येते || ११३.**

ऐशी क्षमता ब्रह्म जाणवी, ब्रह्मत्वचि लाभते स्वये |

नित्य नि शाश्वत चिरंजीविता ब्रह्मी मिळता सहजी ये || ११४.

स्थायी जाणीव विचाराविना, ब्रह्मरूप ते हेची असे |

निश्चल निर्गुण सहजी शांती, तेंव्हा सर्वव्यापी विलसे || ११५.

जीव-भाव तो पूर्ण जातसे ब्रह्म-भावचि चित्ती ठसे |

सर्वत्रचि तो अनुभवी ब्रह्मा, तयाविना कांहीच नसे || ११६.

नसे सौख्य वा दुःख तेधवा, केवळ जाणीव शुद्धची ती |

तेंव्हा विरती द्वैती अनुभव, सारे एकचि अद्वैती || ११७.

जरी जाणले ब्रह्म तयाने, उपासना नि कर्म करी |

देश काल यानुरूप वागुनी, अलिप्त राही व्यवहारी || ११८.

बदले देह नि स्थिती तयाची, मरण जीर्णहि तो होता |

ज्ञात्याला सुख-दुःख न त्याचे, कारण तो देहचि नसता || ११९.

*इह चेत् अवेदीदथ सत्यमस्ति न चेत् इह अवेदीत् महती विनष्टिः ।*

*भूतेषु भूतेषु विचित्य धीराः प्रेत्यास्माल्लोकात् अमृता भवन्ति ॥ ५ ॥*

**तीन गोष्टी या दुर्लभ जगती, देह मानवी हा मिळणे |**

**मोक्षाची ती तीव्रचि इच्छा, संग महात्म्यांचा होणे || १२०.**

**भाग्याने या तिन्ही लाभता, सफल करी नरदेहाला |**

**जोहि मार्गा या अनुसरतो, जाई कदा ना दुर्गतीला || १२१**

**गीतेमाजी आश्वासन ते, प्रगत पथावरी जो जाई |**

**जरि ब्रह्मज्ञान न पुरते झाले, दैव साथ तया देई || १२२.**

**योगभ्रष्ट तो जन्मे सुकुळी, पुढली प्रगती ती होई |**

**अल्प श्रमे मिळवी कैवल्या, सहजे सत्पंथी जाई || १२३.**

**म्हणुनी कृतज्ञ होई ईश्वरा, नर-देही जन्मा आलो |**

**मुक्तीचिहि तीव्रचि इच्छा, पात्र कृपेला तंव झालो || १२४.**

**नित्यचि देई सज्जन संगा, सुयोग्य मार्गा जाण्याला |**

**व्यर्थ न जावो माझे जीवन, भेटवी मजला ब्रह्माला || १२५.**

ज्ञान लाभ या जन्मीचि होई, सुयोग्य ज्ञाना, दे मजला |
कृती सुयोग्यचि नित्य असावी, टाळी नित्यचि मोहाला || १२६.

नको नाद मज तो विषयांचा, धन मानास्तव ना धावे |
परहित साधित सत्कर्मेचि, निस्वार्थी जीवन जावे || १२७.

ज्ञान दृष्टी ती अशीच लाभो, चैतन्यचि सकली पाहो |
नको आसक्ती आणि कामना, समाधान हृदयी राहो || १२८.

अति सूक्ष्मता मना आणुनी, पैल जडाच्या ते पाही |
शाश्वत चैतन्यास अनुभवी, समरस त्यातची ते होई || १२९.

नाम-रूपे ती नित्य बदलती, अस्तित्वचि परि ना बदले |
हे असणेचि मना जाणवे, कांही माझे ना इथले || १३०.

सर्व व्यापी ती शुद्धचि जाणीव, ज्ञान तियेचे हो पुरते |
विवेक आणि वैराग्याने, मिळवी सहजी ब्रह्माते || १३१

या इहलोकी जे-जे आहे, निश्चित कार्या उपयोगी |
कार्य निमित्ते ये संपर्के, धरी ममत्व न तो योगी || १३२.

व्यक्ती आणि पदार्थ नित्यचि, जीवनात येती जाती |
तेवढाचि संबंध तयाचा, ममत्व दूर ठेवी मुक्ती || १३३.

सारे इथले भगवंताचे, एक-दुज्याशी सहकार्ये |

कार्य संपता दुज्या मार्गी ते, ममत्व त्याशी ठेऊ नये || १३४.

कर्तव्याचे पुरते पालन, अलिप्तता परि राखावी |

विरह न गुंतवी मायाजाली, आठवण याची ठेवावी || १३५.

जीवन आपुले प्रारब्धेचि, प्रसंग कैसा तो यावा ?|

नको अपेक्षा कधी मानसी, प्राप्त स्वीकार तो व्हावा || १३६.

अहं नि ममता राग-द्वेषही सदा दूर ते ठेवावे |

जैसे येतील भोग समोरी, स्वीकारीत त्यांशी जावे || १३७.

आयुष्य जैसे नाटक चाले, त्यांत गुंतणे व्यर्थ असे |

नित्यचि बदले आपुली भुमिका, करणे कार्यहि ते तैसे || १३८.

मृत्यू येता देह गळे परि, अस्तित्वा बाधा नाही |

चिरंजीव तो सदाची ज्ञाता, विराट होऊनिया राही || १३९.

भंगताचि घट, व्याप्त पोकळी, सहजी मिळते आकाशी |

पंचत्वी तो देहहि विरता, जीव मिळे परमात्म्याशी || १४०.

दोनहि खंडामाजी येथवरी, उपनिषदे जे कथियेले |

आत्मज्ञान जे सूक्ष्मबुद्धीचे, त्वरित ग्रहण ज्यांनी केले || १४१.

देह-भाव पुरता सोडोनि, ब्रह्मी समरस जे झाले |

त्यांचेसाठी श्रुतीने सारे, आत्मज्ञान ते उकलिले || १४२.

परंतु ज्यांना केवळ समजे, द्वैत न परि ज्यांचे सुटले |

त्यांच्यासाठी पुढील खंडी हे, प्रयासचि श्रुतीने केले || १४३.

॥ इति केनोपनिषद द्वितीयः खण्डः ॥

## खंड तिसरा

परब्रह्म प्राप्तीस्तव ज्यांची, अजुनि तयारी ना झाली |

श्रुति उपदेशी त्यांना आता, जये अचुक दिशा कळली || १४४.

दैवे हा नरदेह लाभला, पूर्ण सार्थकी लावावा |

निजस्वरुपाला पुरते जाणोनी, निवास हरीमाजी व्हावा || १४५.

देह असे हा ध्यानासाठी, चिंतन मननाच्यासाठी |

ज्ञान साधना सत्यशोध हि, कोण मी? या बोधासाठी || १४६.

नश्वर देहे ब्रह्म अनुभुती, येता देहा सोडावे |

चढुनी जाता शिडी सोडणे, वृथा शिडीत कां रंगावे ?|| १४७.

कार्यकाळ तो किती देहाचा, कुणासही ते ना  ठावे |

म्हणुनी क्षण क्षण हा मोलाचा, वेगे ब्रह्मा शोधावे || १४८.

पुढला जन्म न आपुल्या हाती, याच जन्मी ते लाभावे |

आत्मबोधचि ज्ञेय आपुले, श्रुति द्वारे जाणुनी घ्यावे || १४९.

म्हणुनी ज्ञानेश्वरी सांगते, ईश्वरास गोचर करण्या |

श्रुति अभ्यासुनी, जाई सुपंथे, सत्वर बोधाशी होण्या || १५०.

*ब्रह्म ह देवेभ्यो विजिग्ये तस्य ह ब्रह्मणो विजये देवा अमहीयन्त ॥*

*त ऐक्षन्ता अस्माकं एवायं विजयोऽअस्माकं एव अयं महिमा इति ॥१॥*

**ज्ञात्याला ते सहाय्य करण्या, होत प्रेरणा ब्रह्माची |**

**दीप प्रज्वलित, होता नुरते, वार्ताही काळोखाची || १५१.**

**सुयश लाभता जेंव्हा जीवनी, ऋण देवाचे आठवावे |**

**कृतज्ञ भावे विनयी राहुनि, अहंकारी ते ना व्हावे || १५२.**

**जेही घडते तया कृपेने, निमित्तमात्रची आपण ते |**

**नित्य ध्यानी ते सदा असावे, कर्मचि आपण करणे ते || १५३.**

**कैसे त्याचे फल ते लाभे, अधिकार तो नच आपुला |**

**निष्कामे पुरत्या क्षमतेने, नित्य करावे कार्याला || १५४.**

**मजचिस्तव जाहले असे हे, परि मी नच हे केले |**

**सदैव ऐशी वृत्ती असावी, ब्रह्मज्ञान जरी झाले || १५५.**

**श्रुति समजावी हेचि आपणा, गोष्ट सांगुनी स्वर्गींची |**

**गर्वहरण देवांचे कैसे, समजुनी उमजहि होण्याची || १५६.**

देवांची त्या असुरांसंगे, एक लढाई ती झाली |

ईश्वरी शक्ती देवांपाठी, असुरांची सेना हरली || १५७.

सारे देवहि ते आनंदी, कथा सांगती शौर्याच्या |

जो तो सांगे कसा वीर मी, गोष्टी निजकर्तृत्वाच्या || १५८.

विजयोत्सव तो निज कीर्तीचा, देवे आयोजित केला |

एक एकहि सांगू लागले, वेळ पुरेना कथनाला || १५९.

असुनी जवळी दैवी संपदा, गर्वी रंगुनिया गेले |

विनय आणि अमानित्वाहि, विसरुनी मोहे ते फसले || १६०.

फुशारकीने मारुनी प्रौढी, म्हणती हा आमुचा महिमा |

दुर्दम्यचि ती शक्ती आमुची, असुरांची ती काय तमा ?|| १६१.

हा गर्वाचा फोल बुडबुडा, भगवंता वाटे चिंता |

म्हणुनि योजिला प्रसंग अद्भुत, स्मरणी यावी कृतज्ञता || १६२.

*तद्वैषां विजज्ञौ तेभ्यो ह प्रादुर्बभूव तन्न व्यजानत किं इदं यक्षमिति ॥ २ ॥*

**भगवंताला वाटे नित्यचि, प्रगती व्हावी, संततीची |**
**जेंव्हा मोहे अवनती समजे, करी योजना घटनांची || १६३.**
**जेणे अंतर्मुखता येई, उमज येत निज दोषांची |**
**भगवंताची कृपा साऊली, सांवरी भक्ता वेळीची || १६४.**
**जाणुनिया अभिमान शक्तीचा, विजयाने देवा झाला |**
**परब्रह्म करी धारण देहा, प्रगट यक्षरूपे दिसला || १६५.**
**दिव्य देह नि तेज विलक्षण, कुणा कळेना, कोण असे ?|**
**देव विचारिती एक दुज्याला, परि कुणा ठाऊक नसे || १६६.**
**नवल वाटले तेंव्हा देवा, सर्वज्ञचि आम्ही असुनी |**
**कोण असे हे ?आम्ही न जाणतो, हे आश्चर्य तया मनी || १६७.**

*तेऽग्निं अब्रुवन् जातवेद एतत् विजानीहि किं एतत् यज्षं इति तथा इति ॥३॥*

**अग्नी देव जो तेजचि केवळ, मूळ असे ते ज्ञानाचे |**

**देव विचारिती अग्नीला की, ज्ञान तुला तर सकलांचे || १६८.**

**तूचि तेज-रूप सकली असता, करवी ज्ञान या विभूतीचे |**

**जातवेद हे अग्निदेवता, पूज्य कोण तंव ओळखीचे ?|| १६९.**

**अग्नी वदला, अस्तित्वचि हे, समोर आपुल्या अवतरले |**

**पूज्य भाव सहजी तो उमटे, परि मी नच त्या ओळखिले || १७०.**

**अग्नि हा प्रतिनिधी देवांचा, जाण तयाची तेजस्वी |**

**"आपण जवळी जाऊनि जाणा", इंद्र तया ऐसे विनवी || १७१.**

*तत् अभ्यद्रवत् तं अभ्यवदत् कोऽसि इति ।*

*अग्निर्वा अहं अस्मि इति अब्रवीत् जातवेदा वा अहमस्मि इति*

*॥ ४ ॥*

**त्या दैवी अस्तित्वापाशी, अग्नी पुसण्यास्तव गेला |**

**सकलही मजला ओळखतीचि, सरळ विचारी यक्षाला || १७२.**

**दिसता पूजनीय मज आपण, कोण नि कोठुनिया आला ?|**

**नवल आज हे काय वर्तले, मी न ओळखे आपणाला || १७३.**

**यक्ष म्हणे त्या, मज जाणाया, युगे युगे ती किती गेली |**

**मला जाणण्याआधी द्यावी, ओळख ती कि मज आपुली ||१७४.**

**काय जाणतो तूं आपणाला?, ओळख दे आपुली करुनी |**

**अग्नी म्हणे मज सर्व जाणती, प्रसिद्ध ऐसा मी अग्नि || १७५.**

**विश्वी जेही तेज असे ती, मम रूपे जाणती सारे |**

**जातवेद ते मलाची म्हणती, तेज ज्ञानहि मजद्वारे || १७६.**

*तस्मिँस्त्वयि किं वीर्यं इति अपि इदँ सर्वं दहेयं यदिदं पृथिव्यां इति ॥ ५॥*

**यक्ष पुसे त्या, मी न जाणिले, कवण क्षेत्रीहि समर्थ ते ?|**

**अग्नी म्हणे हे नवलचि मजला, नसे कुणी न मज जाणे ते || १७७.**

**सामर्थ्यहि मम सकला ठाऊक, प्रखर नि दाहक असेचि मी |**

**स्पर्शे माझ्या सहजी दहन ते, तेजोमय मी आसामी || १७८.**

*तस्मै तृणं निदधावेतद् दह इति । तत् उपप्रेयाय सर्वजवेन तन्न शशाक दग्धुं*

*स तत एव निववृते न एतत् अशकं विज्ञातुं यत् एतद् यक्षं इति ॥ ६॥*

ऐकुनी हे यक्षाने सहजी, रूक्षचि गवताची काडी |

अग्नीपुढे ठेऊनी वदे त्या, हिजला जाळुनिया काढी || १७९.

हिला जाळीता, पटेल मजला, सांगितले त्या तथ्य किती |

वापरी आपुल्या सामर्थ्याला, दहन करीचि काडी ती || १८०.

अग्नीने प्रौढीने काडीला, स्पर्शे उष्णताचि दिधली |

परीणाम परि कांही दिसेना, जरि दाहकता वाढविली || १८१.

वाणी देवता ती अग्नीची, ब्रह्म परि त्या पैलचि ते |

नुसत्या पांडित्ये शास्त्रांची, नच ब्रह्महि ते कळते || १८२.

म्लान मुखे नि निःशब्दे तो, परतचि गेला माघारी |

देवसभा ऐकुनी वृत्त ते, सारेची आश्चर्य करी || १८३.

*अथ वायुं अब्रुवन् वायव एतत् विजानीहि किं एतत् यक्षं इति तथा इति ॥७॥*

**इंद्र तेधवा म्हणे वायुला, समर्थ तूं तर रे जगती |**

**जावे त्या विभुतीच्या पाशी, जाण नेमके कोणचि ती?|| १८४.**

**वायू मनाशी म्हणे अग्नीला, जे न जमे ते, करीन मी |**

**कोण देवता असे ओळखीन, मी तर गतीचाही स्वामी || १८५.**

*तत् अभ्यद्रवत् तं अभ्यवदत् कोऽसि इति ।*

*वायुर्वा अहं अस्मि इति अब्रवीत् मातरिश्वा वा अहं अस्मि इति ॥ ८ ॥*

*तस्मिन् स्त्वयि किं वीर्यं इति अपीदं सर्वं आददीयं यदिदं पृथिव्यां इति ॥ ९ ॥*

**जवळी जाता यक्षापाशी, यक्ष विचारी कोण असे?|**

**मी ना ओळखिले आपणाला, परिचय द्यावा, वायू हंसे || १८६.**

**'मातरिश्वा' मज म्हणती सारे, मी वायू ! जाणत नाही?|**

**ममसम गती ती नसे कुणाला, उडवित क्षणात पर्वत ही || १८७.**

*तस्मै तृणं निदधावेतत् आदत्स्व इति । तत् उपप्रेयाय सर्वजवेन तन्न शशाक आदातुं स तत एव*

*निववृते न एतत् अशकं विज्ञातुं यत् एतत् यक्षं इति ॥ १० ॥*

**यक्ष म्हणे त्या, नकोच पर्वत, आपण ही काडी उडवा |**

**कळेल मजला, तंव सामर्थ्या, मजला प्रतीति ती दावा || १८८.**

**तुच्छपणे वायू ती पाही, क्षुल्लक काडी गवताची |**

**हळू फुंकिता क्षणी उडेल ती, चुणूक दावी ती स्पर्शाची || १८९.**

**परि तृण काडी, स्थिर तेथेची, जोर वायुने वाढविला |**

**जोरे वारा, तुफान होता, फरक न कांही काडीला || १९०.**

**वायू देवता ती स्पर्शाची, ज्ञान-इंद्रिये संकेती |**

**पैल इंद्रिया ब्रह्म असे ते, सांगेचि यातुनी श्रुति || १९१.**

**अधोमुखचि तेंव्हाच होऊनि, देवाजवळी तो गेला |**

**मंद वाणीने, घडले सांगे, क्षीण सुरे वृत्तांताला || १९२.**

**म्लान मुखाने वायू अग्नी, नि:शब्दे जवळी बसती |**

**शब्द न कांही भाव मुखीचे, एक-दुज्याला जाणवती || १९३.**

जगातल्या त्या प्रमुख शक्ती, प्रकाश आणि दुजी गती |

भौतिक लाभास्तव उपयोगी, तेणे नच ब्रह्मप्राप्ती || १९४.

महाभारती गोष्ट भिमाची, वृद्ध कपिरूपे हनुमंत |

लांब पृच्छ मार्गात पसरुनी, असे बैसला तो शांत || १९५.

भीम म्हणे हे उचली शेपूट, म्हणे मारुती अशक्त मी |

तूचि करी ते बाजूला रे, सशक्त तूं तर आसामी || १९६.

गर्व शक्तीचा होता भीमा, परि ते शेपूट उचलेना |

विरे गर्व तैशीच कथा ही, गर्वे शक्ती चालेना || १९७.

*अथ इन्द्रं अब्रुवन् मघवन् एतत् विजानीहि किं एतत् यक्षं इति तथा इति*

*तत् अभ्यद्रवत् तस्मात् तिरोदधे ॥ ११ ॥*

**देव म्हणती मग इंद्रालागी, आपण स्वामी ते आमुचे |**

**जावे दिव्यचि यक्षापाशी, जाणा स्वरूपची त्याचे || १९८.**

**मुकुट शिरीचा सावरुनिया, उत्तरीय ते नीट करी |**

**क्षणी इंद्र तो येता जवळी, अव्यक्ती गेलाच हरी || १९९.**

**ज्ञान-गुण कलाहि जवळी, अहंकारी तो जीवात्मा |**

**ब्रह्म तयाशी कदा दिसेना, ना घालवी अज्ञान तमा || २००.**

**आधी ज्याहि दोन देवता, गेल्या त्या यक्षापाशी |**

**त्याशी झाले संभाषण तरी, परि संपर्क न इंद्राशी || २०१.**

*स तस्मिन् एव आकाशे स्त्रियं आजगाम बहुशोभमानां*

*उमां हैमवतीं तां होवाच किं एतत् यक्षं इति ॥ १२ ॥*

**सत्वगुणाने विचार करी तो, गर्वचि आम्हासी नडला |**

**शक्ती जी वाटेचि आमुची, स्वामी ब्रह्म असे त्याला || २०२.**

**अशी दिव्य शक्ती न पाहिली, दिसता हृदयी मंगलता |**

**मी गेलो देवेंद्र म्हणोनी, अहंकार मज तो नडला || २०३.**

**मनोमनी तो विनम्र भावे, वंदन करी त्या शक्तीला |**

**रज-तम गेले विनम्रता ये, सत्वगुणे मौनचि झाला || २०४.**

**अहंकार नि प्रौढी जोवरी, ब्रह्म तयाला ना प्रगटे |**

**करुनी समर्पण मौने सारे, ज्ञान तयाशीचि भेटे || २०५.**

**अशी नम्रता मनी दाटता, उमा दिव्य ती अवतरली |**

**सुवर्ण कांती, सुस्मित वदनी, जगदंबा दृष्टीस पडली || २०६.**

**वंदन करुनी, पुसे इंद्र तिज, आता येथुनी जे गेले |**

**पूजनीय ते परब्रह्मचि, कां होते ते अवतरले ?|| २०७.**

**तृतीय खंड समाप्त**

# चतुर्थ खंड प्रारंभ

*सा ब्रह्मा इति होवाच ब्रह्मणो वा एतत् विजये महीयध्वं इति*

*ततो हि एव हैव विदाञ्चकार ब्रह्मा इति ॥ १ ॥*

**पावन ब्रह्म-विद्या ती प्रगटे, उमारूपाने सामोरी |**

**ईश्वराशी ते जाणायाशी, तीच मार्ग तो सुलभ करी || २०८.**

**व्यक्त रूपाने परम सत्य ते, उमारूपाने या जगती |**

**आणि महेश्वर तो अव्यक्ते, ऐसी ब्रह्माची महती || २०९.**

**मी न जाणिले ते ब्रह्माला, परि जाणण्या उत्सुकता |**

**ऐशी जोवरी नसेच वृत्ती, ब्रह्मज्ञान न ये हाता || २१०.**

**उमा सांगते गुरुरूपाने, स्वये ब्रह्मचि ते होते |**

**त्याच्या शक्तीबळेचि तुम्ही, जिंकियले ते असुराते || २११.**

**उमा शब्दी ॐकार असे तो, श्रुति संकेती आपणाला |**

**ध्वनी, नाद कंपने, समरसे, जाणण्यास त्या ब्रह्माला || २१२.**

जरि हरि कर्ता, 'मीचि कर्ता, घडे सकल माझिया बळे' |

त्याच्या दैवी सामर्थ्याविण, समर्थ ना ते तुम्ही दुबळे || २१३.

असुराशी युद्धी विजयी ते, कृतज्ञ व्हावे भगवंता |

शक्ती प्रभूची सफल जाहली, विजयश्री आली हाता || २१४.

परि अज्ञाने तुम्हास वाटे, विजय आमुच्या शक्तीचा |

अहंकार तो झटका पुरता, प्रभाव सारा ब्रह्माचा || २१५.

कृतज्ञ भावे त्याशी नमुनी, श्रेयचि ते भगवंताचे |

परि आपुल्या वृथाभिमाने, विसरलाचि ऋण ते त्याचे || २१६.

आपण केवळ साधन असता, अहंकार कर्तृत्वाचा |

देव असोनी असुर संपदा, केला आश्रय तो तिचा || २१७.

हेचि अंतरी पूर्ण ठसावे, म्हणुनी प्रसंग दाखविला |

इंद्रा कळली चूक तयाची, विनम्र वंदी उमेला || २१८.

उमा देवीच्या उपदेशे त्या, आनंद इंद्राशी झाला |

सगुण नि निर्गुण उभय रूपे त्या, अनुभविले मी ब्रह्माला || २१९.

जीवन काली, असाध्य ऐसे, जेही लाभे आपणाला |

कृतज्ञ भावे नमी ईश्वरा, तुझ्यामुळेचि विजय मला || २२०.

**पैलवान जिंकी ज्या शक्तीने, त्या शक्तीला वंदावे |**

**बळे त्याचिया विजय होतसे, नित्यचि हे ध्यानी घ्यावे || २२१.**

**इंद्र जाहला अंतर्मुख नि, देवा समीप तो गेला |**

**उपदेशी तो जेही शिकला, अहंकार पुरता गेला || २२२.**

*तस्माद्वा एते देवा अतितरां इव अन्यान् देवान् यत् अग्निः वायुः इन्द्रः ते*

*हि एनत् नेदिष्ठं पस्पृशुः ते हि एनत् प्रथमो विदाञ्चकार ब्रह्मेति ॥ २ ॥*

*तस्मात् वा इन्द्रः अतितरां इव अन्यान् देवान् स हि एनत् नेदिष्ठं पस्पर्श*

*स हि एनत् प्रथमो विदाञ्चकार ब्रह्मा इति ॥ ३ ॥*

**वायु-अग्नी श्रेष्ठ देवता, ज्यांनी संभाषण केले |**

**परि इंद्र तो श्रेष्ठ त्याहुनि, ब्रह्म तयाने जाणियले || २२३.**

**वायु नि अग्नी यांचेसाठी, द्वैतभाव तो नच सरला |**

**परि इंद्राला ज्ञान होऊनि, जाणियलेचि ब्रह्माला || २२४.**

*तस्यैष आदेशो यदैतद् विद्युतो व्यद्युतदा इतीतिन्न्यमीमिषदा इत्यधिदैवतम् ॥ ४ ॥*

**साधक ध्याने जया शोधिती, हृदयाकाशी ब्रह्मासी |**

**क्षणैक चमकुनी दर्शन देई, अर्थ असा हा रुपकाशी || २२५.**

**ब्रह्म ना दिसे, अव्यक्तचि ते, व्यक्त होत हृदयाकाशी |**

**क्षणैक चमके हृदयमंदिरी, जणु दर्शन त्या देण्याशी || २२६.**

**ब्रह्म शोधिता, नेत्र बंद ते, चमके जाणीव तेजस्वी |**

**तिचीच तुलना केली श्रुतीने, चमकुनी जात्या ज्ञानाशी || २२७.**

**त्या तेजे ते अंतर उजळे, प्रकाशमय जीवन होई |**

**दर्शन ऐसे देत अनुभूती, द्वैत न उरले ते कांही || २२८.**

*अथ अध्यात्मं यत एतत् गच्छतीव च मनो अनेन च एतत्*
*उदुपस्मरति अभीक्षणं सङ्कल्पः ॥५॥*

**ब्रह्म जाणण्याची ज्या इच्छा, त्याने निवांत बैसोनी |**
**निराकार निर्गुण मन करणे, विचारशून्यचि होऊनी || २२९.**
**वृत्ती कांही उठु ना द्यावी, निर्विकार मन स्वच्छ असे |**
**केवळ ब्रह्माची अनुभूती, विशिष्ट बघणे त्यांत नसे || २३०.**
**अशा स्वच्छ निर्विकार मनी ते, सहजी अनुभूती शून्याची |**
**ते कांहीही नसणे देई, अनुभूती ती शांतीची || २३१.**
**केवळ अस्तित्वाची अनुभूती, पूर्णतया ती अद्वैती |**
**तदाकारिता अनंताशी त्या, स्थिती अनुपम सुखमय ती || २३२.**
**स्थिती अशी ही नित्य असावी, उलाढाल जरि व्यवहारी |**
**देहा गुंतू देत परंतु, अंतरी पूर्ण निर्विकारी || २३३.**
**मन विचार ते केवळ ब्रह्मी, ध्यास दुजा तो नच कांही |**
**द्वितीय खंडी याचे वर्णन, जेणे ब्रह्म अनुभूती येई || २३४.**

*तत् ह तत्वनं नाम तद्वनं इति उपासितव्यं*

*सः यः एतत् एवं वेद अभि ह एनं सर्वाणि भूतानि संवाञ्छन्ति॥६॥*

**जेही दिसते पूजनीय ते, ब्रह्मचि म्हणुनि वर्तावे |**

**तदाकार हे नित्य अवस्था, सर्वत्रचि त्या देखावे || २३५.**

**अशी उपासना ती करिता, पूज्य होतसे या जगती |**

**समभावचि तो नित्य अंतरी, ब्रह्म एकचि अनुभूती || २३६..**

*उपनिषदं भो ब्रूहि इति उक्ता ते उपनिषद् |*

*ब्राह्मीं वाव ते उपनिषदं अब्रूम इति ॥ ७॥*

**आचार्य म्हणती, शिष्यवरा तूं, पुसिली विद्या ब्रह्माची |**

**आधी तत्व नि गोष्टी नंतर, उकल केली त्या गुह्याची || २३७.**

**महान या उपनिषदाशी, पूर्ण समजुनीया घ्यावे |**

**रहस्य तुजला कळेल पुरते, चिंतुनी त्या श्रद्धाभावे || २३८.**

**देव यातले बघशील निजरुपि, गोष्ट नसे हे कथन तुझे |**

**आणि यक्ष तो परब्रह्म ते, हृदय मंदिरी जो विरजे || २३९.**

**त्याशी जाणण्या केवळ ज्ञानचि, वत्सा असते उपयोगी |**

**उपासना नि कर्म सहाय्ये, होशील पात्रचि तूं योगी || २४०.**

*तस्यै तपो दमः कर्म इति प्रतिष्ठा वेदाः सर्वाङ्गानि सत्यं आयतनम् ॥ ८॥*

**ही ब्रह्माची विद्या तुजला, तप, दम, कर्मे ती लाभे |**

**शीत-उष्ण नि सुख-दुःखहि ते, स्थिरचि हानी आणि लाभे ||२४१.**

**मन आणि तंव बाह्य इंद्रिये, यांचा संयम तो करणे |**

**स्वधर्म-पालन यज्ञ नेहमी, सदाचरणी जीवन क्रमिणे || २४२.**

**मान-प्रतिष्ठा, वृथाची लौकिक, हे सारे तूं दूर करी |**

**शास्त्राधारे नित्यचि वर्तन, सत्याची ती कांस धरी || २४३.**

**शुद्ध मनाने नित वर्तावे, अलिप्त नित्यचि व्यवहारी |**

**द्वैती राहुनि, शुद्धी साधणे, कधी न गुंतणे संसारी || २४४.**

*यो वा एतां एवं वेद अपहत्य पाप्मानं अनन्ते स्वर्गे लोके ज्येये प्रतितिष्ठति प्रतितिष्ठति ॥९॥*

**फलश्रुति आचार्य सांगती, शिकवण यातील अनुसरता |**

**श्रवण-मनन नि निदिध्यासने, जीवनात ती आचरिता || २४५.**

**कळे साधका पूर्ण अनुभवे, ब्रह्म सत्य, जगत मिथ्या |**

**मीच ब्रह्म ते सहज अनुभवे, कैवल्यचि मग ये हाता || २४६.**

**कर्मे नि पापेही, जळती, अज्ञानाचे नाम मिटे |**

**शुद्धचि होई अंत:करणे, बंधन ते तत्काळ सुटे || २४७.**

**स्वर्गसुखे ती सहजी प्राप्तचि, आचरण शुद्ध नि निर्मल ते |**

**या लोकी नि परलोकीहि, सुखमयताचि अनुभवते || २४८.**

**केनोपनिषदि गुह्य उकलले, आपण आलो ज्यासाठी |**

**सीमित काल या जगती आपुला, प्रसन्न करणे जगजेठी || २४९.**

**नित्य रहावे कृतज्ञ त्याशी, सारी असे  कृपा त्याची |**

**स्वधर्म पालन उत्तम करणे, परि कर्ता तो श्रीहरीची || २५०.**

**|| हरि ॐ ||**

**श्री केनोपनिषद समाप्त**

# केनोपनिषद सार

(श्री शरद यांच्या ‘उपनिषदे’ या ‘मि.पा’. या नेटवरील माहिती आधारे साभार)

केनोपनिषद हे दशोपनिषदापैकी असून आद्य शंकराचार्यांनी त्यावर भाष्य लिहले आहे. हे सामवेदाच्या तलवकार शाखेचे उपनिषद असून या शाखेचा एकमेव उपलब्ध ग्रंथ आहे हा तलवकार ब्राह्मणाचा नववा अध्याय आहे. याला ब्राह्मोपनिषद असेही नाव आहे.

पहिल्या मंत्राची सुरवात "केनेचितम् पतति" अशी असल्याने याचे "केनोपनिषद" असे पडले. एकूण ३५ मंत्र असून चार खंडात विभाजन केले आहे. क्रमवारीने ९, ५, १२ व ९ मंत्र असून पहिले दोन खंड पद्यमय आणि शेवटचे दोन गद्यमय आहेत.

पहिल्या दोन खंडात शिष्य गुरूंना प्रश्न विचारतो व गुरू त्याला उत्तर देतात.. उपनिषदातील महत्वाच्या तत्वज्ञानाचा भाग इथे आहे. तिसऱ्या व चौथ्या खंडात ब्रह्माचे महत्व विशद करणारी एक गोष्ट आहे. ब्रह्मापुढे देवता कशा निष्प्रभ होतात ते कथेत वर्णन केले आहे.

**प्रथम खंड**

जीवनात अचानक कांही घडते. ते कसे कुणामुळे? प्रश्न अनुत्तरित राहतो. या मनाला, या इंद्रियांना, ही प्रेरणा कोण देतो ? हाच प्रश्न शिष्य आचार्यांना विचारतो.

हे मन कोणापासून प्रेरणा घेऊन, कामनायुक्त होऊन आपल्या विषयामागे जाते ? कोणाकडून चालना घेऊन प्रथम प्राणाचे स्पंदन होते ? वाणी कोणाच्या सत्तेने बोलते ? कोणता देव डोळयांना व कानांना प्रेरणा देतो ?

लक्षात घ्या, शिष्याला या देहाबाहेरची कोणी तरी शक्ती हे काम करत असावी अशी अंधुक कल्पना आहे. आत्मा-ब्रह्म इत्यादीची फार माहिती नाही म्हणून कोणीतरी "देवता" ही प्रेरणा देत असावी असे त्याला वाटते. आचार्य त्याला उत्तर देतात.

जो कानाचा कान, मनाचे मन, वाणीची वाणी आहे तोच प्राणाचा प्राण व डोळ्याचाही डोळा आहे.असे जाणून, धैर्यवान पुरुष संसारापासून सुटून हा लोक पार करून अमर होतात

कानाचा कान असलेले, मनाचे मन असलेले, चैतन्य हेच प्राणाचा प्राण आहे., हा अंतस्थ आत्माच कानाच्या पाळीला, कानाच्या छिद्राला ऐकण्याची शक्ती देतो. हे चैतन्य, हा आत्मा एकदा जाणला की

इंद्रियांची, देहाची आसक्ति सोडून , "मी म्हणजे हा देह," हा भास सोडून, धैर्यवान माणसे संसारापासून सुटून, जन्म-मरणाचा फेरा नसल्याने अमर होतात.

जेथे आत्मा प्रवेश करतो, त्या ब्रह्मात, तेथे नेत्र पोहोचत नाही, वाणीचा शिरकाव होत नाही, मन जात नाही, त्यामुळे कशा प्रकारे शिष्याला त्याचा उपदेश करावा ते आम्हाला समजत नाही. ते आमच्या लक्षात येत नाही. ते माहीत असल्यापेक्षा वेगळे व अज्ञाताहून पलिकडे आहे; असे आम्ही पुरातन पुरुषांकडून ऐकले आहे. त्यांनीच ते आम्हास समजावले होते..

जेथे वाणी पोचतच नाही, त्या ब्रह्माविषयी शिष्याला वाणीने माहिती देणार तरी कशी? हा आचार्यांचा प्रश्न आहे. ते ज्ञात-अज्ञात या दोहोंपलिकडचे आहे. आचार्यांच्या आधीच्या ज्ञानी लोकांनाही तोच अनुभव होता व तसेच त्यांनी सांगितले होते.

जे वाणीने प्रकाशित होत नाही, परंतु वाणी ज्याने प्रकाशित होते, त्यालाच तू ब्रह्म असे जाण. ज्या यज्ञदेवता व उपासना देवतांची लोक उपासना करितात त्या ते ब्रह्म नाही.

वाणीला चेतना देणारे ब्रह्म वाणीने प्रकाशित होणार नाही, त्याचे वर्णन वाणी करू शकणार नाही हे कळण्यासारखे आहे. जे वाणीला प्रेरणा देते ते ब्रह्म. हे सांगतांना. ते म्हणतात. उपासनादेवता या ब्रह्म नव्हेत.

ज्याचे मनाने मनन करिता येत नाही पण ज्याचेमुळे मनाकडून मनन घडते असे म्हणतात, जे डोळ्याने पहाता येत नाही पण ज्याचेमुळे डोळे पाहू शकतात, जे कानाने ऐकता येत नाही पण ज्याचेमुळे कान ऐकू शकतात, जे श्वासोच्छवास करत नाही पण ज्यामुळे प्राण श्वासोच्छवास करतो, ते ब्रह्म होय. ज्याची लोक उपासना करतात, ते नव्हे

उपास्य देवता या ब्रह्म नव्हेत हे पुन्हापुन्हा सांगण्याचे कारण सामान्य लोकांवर ह्या देवतांच्या सामर्थ्याबद्दल फार प्रभाव होता..

**द्वितीय खंड**

जर तुला "मी ब्रह्म चांगल्या रीतीने जाणतो " असे वाटत असेल तर,तू थोडेच जाणले आहेस, त्याचे जे रूप तू जांणतोस(आध्यात्मिक) व जे रूप देवतांना ठाऊक आहे (अधिदैविक) तेही अल्पच आहे. म्हणून तू ब्रह्मस्वरूपाचा अधिक विचार केला पाहिजेस.

शिष्य नम्रपणे म्हणतो,

**“नाहं मन्ये सुवेदिति, नो न वेदेतिवेद च !**

**यो नस्तद् वेद तद् वेद, नो न वेदेति वेद च !!२!!”**

आचार्य म्हणतात, जर ते झाल्याची खात्री वाटत नसेल, तर तुला ज्ञान झालेच असे समज. कारण ते ज्ञान झाले असे म्हणण्याच्या पलिकडे आहे.

ब्रह्माबद्दल विचार करताना, त्या बद्दल ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करतांना एक मोठा धोका मुमुक्षुच्या मार्गात असतो. आचार्यांनी सांगितलेले मला समजले म्हणजे मला ब्रह्माचे ज्ञान झालेच, अशी समजुत होणे सहज शक्य असते. आचार्य म्हणतात,. तुला कळले, असे वाटत असेल तर तुला कळलेलेच नाही. पण अभ्यास करीत राहिलास तर तुला वाटेल की आपल्याला ज्ञान झालेले नाही. त्या वेळीच तुला

खरे ज्ञान झालेले असेल. ज्ञान होण्याच्य पलिकडे असलेले तेच तुला ज्ञान देईल.

ज्या ज्ञात्याला ज्ञान झाले नाही असे वाटते, त्याला ज्ञान झाले असे मानावे. आणि ज्याला ज्ञान प्राप्त झाले असे वाटते, त्याला ज्ञान प्राप्त झाले नाही, असे मानावे.

संशयरहित ज्ञान ते ज्ञान होय. त्या ज्ञानाने मोक्ष मिळतो. ज्ञानामुळे सामर्थ्य प्राप्त होते व साक्षात्काराने मोक्ष मिळतो.

## तृतीय खंड आणि चतुर्थ खंड

तिसऱ्या खंडात ब्रह्माचे महत्व सांगणारी एक कथा आहे.

देव-असूर युद्धात देवांचा विजय झाल्यावर देवांना वाटले की हा आपला पराक्रम आहे. तेव्हा ते जाणण्याच्या योगाने आपल्याला लाभलेल्या शक्ती ही ब्रह्माची कृपा आहे हे मोठ्र्या खुबीदारपणे गोष्टीद्वारा सागितले आहे. विजेप्रमाणे ब्रह्म एकदा प्रगट झाले व लगेच गुप्त झाले. हा अधिदैवत पक्ष आहे. नंतर अध्यात्म पक्ष सांगितला जातो. मन ब्रह्म जाणते. पुन;पुन्हा त्याचे स्मरण करते. हा अध्यात्म पक्ष आहे. (४. ५.)

या उपनिषदाकरिता "तप","दम", "कर्म" ही पाया होत."वेद-वेदांगे" व "सत्य"हे त्या ब्रह्मविद्येचे स्थान होय.

जो हे केन उपनिषद आणि ब्रह्मविद्या जाणतो, त्याचे पाप दूर होते, तसेच तो स्वर्गात अनंतकाल सुखात राहतो

**तत्वज्ञानाचे सार**

(१) जगाचे आद्य मूळ आत्मा आहे.

(२) जो स्वत:ला ज्ञान झाले आहे असे समजतो, तो ज्ञान न झालेला असतो.

(३) निसर्गातील प्रत्येक घटनेमागे आणि मानवी हालचालीमागे ब्रह्माची शक्ती असते.

(४) हे सत्य जाणणे म्हणजे अमृतत्व मिळवणे होय.

या उपनिषदातील देवांच्या आपण शक्तिमान असल्याची गोष्ट फारच बोलकी आहे. आपल्याला असलेली शक्ती व क्षमता ही भगवंताची कृपा आहे, आज मी आहे, तो त्याच्या कृपेचा भाग आहे, आपली श्रीमंती सत्ता बळ हे त्याचेमुळे आहे, हे सतत ध्यानी ठेऊन वृथा अहंकार नसावा ही सर्वोत्तम शिकवण त्यातून घेणे या श्रीकृष्ण व ज्ञानदेव जयंतीला आपण शिकणे आवश्यक आहे.

ज्ञानेश्वरी सांगून झाल्यावर ज्ञानदेव म्हणतात, ‘आता उरले माझे केवळ पाईकपण’. श्रीकृष्णाने द्वारकेचा राजा असताही, राजसूय यज्ञात उष्टे उचलणे, पत्रावळी काढणे ही कामे घेतली.

आजकाल सत्तेवर असतांना आपले सामर्थ्य वापरून अहंकाराची मस्ती वापरून मिजास मिरविणारे व सत्तेचा बुरुखा उतरताच केवीलवाणे जीवन जगणाऱ्यांनी यातून शिकावे.

‘केन’? कुणामुळे हे माझे मोठेपण आहे? हा प्रश्न विचारून स्वधर्माचे भान ठेवणे फार महत्वाचे आहे

शेवटची काव्यपंक्ती हाच खरा सार आहे.

**नित्य रहावे कृतज्ञ त्याशी, सारी असे कृपा त्याची |**

**स्वधर्म पालन उत्तम करणे, परि कर्ता तो श्रीहरीची || २५०.**


आपणा सर्वास ही जयंती “ **तमसो मा ज्योतिर्गमय** ‘ या प्रार्थनेचे फलित लाभ देवो. जेणे करून


**‘मृत्योर्मा अमृतं गमय** ‘ याचेही सहजी फलित लाभो**.**


**हरि ॐ** ||


**अण्णा ३०/०८/२०२१.**

**{ श्रीकृष्ण व ज्ञानेश्वर जयंती }.**




अण्णा (श्री. मधुकर सोनवणे) यांची ई साहित्यवरील इतर पुस्तके
क्लिक/टॅप करताच उघडतील

